| वर्ष - 7 । अंक - 187 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज TM

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | । मंगळवार, दिनांक 14 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



दीपावली पाडव्यानिमित्त सर्वांना प्रकाशदायी शुभेच्छा

-महाईन्यूज परिवार



## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळेत

# क्रीडाशिक्षकांची वानवा!

## » प्रशासनाचे क्रीडा विभागाकडे दुर्लक्ष: 105 शाळांमध्ये केवळ आठच शिक्षक

।पिंपरी-चिंचवड। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या सर्व शाळा स्मार्ट करण्याकडे महापालिका प्रशासनाचा कल आहे. त्यासाठी डिजिटल शिक्षण देण्यात येत आहे. अभ्यासाव्यतिरिक्त काही विद्यार्थी क्रीडा निपुणदेखील आहेत. मात्र, एकीकडे शाळा डिजीटल होत असताना प्रशासनाचे क्रीडा विभागाकडे दुर्लक्ष होत आहे. महापालिकेच्या 105 शाळांमध्ये फक्त आठच क्रीडा शिक्षक आहेत. तसेच, विद्यार्थ्यांना शाळांमध्ये पुरेसे क्रीडा साहित्य देखील उपलब्ध नाही.**



विद्यार्थ्यांचा शारीरिक आणि बौद्धीक विकास हा शाळेतच (PIMPRI)घडत असतो. शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ राहण्यासाठी मैदानी खेळ खेळणे आवश्यक असते. मात्र, महापालिकेच्या 22 शाळांना मैदान नाही. 17 शाळांची मैदाने छोटी असल्याने विद्यार्थ्यांनी खेळायचे कसे असा प्रश्न पडत आहे. शाळेच्या वेळापत्रकात आठवड्यातील दोन ते चार तास खेळाचे असतात.

यामध्येच विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांचा विकास होत असतो. विद्यार्थी कोणत्या खेळात निपुण आहे. हे विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शिक्षणातील अवस्थेतच कळण्यासा मदत होते. पण याच खेळण्या-बागडण्याच्या वयात क्रीडा शिक्षक आणि क्रीडा साहित्य नसल्याने विद्यार्थ्यांची खेळाविषयीची गरज आणि आवड कमी होत आहे. प्रत्येक शाळेच्या मैदानात विशिष्ट ठिकाणी खो-खो चे खांब आणि डबलबार असतात. विद्यार्थी शाळेच्या सुटीमध्येदेखील याठिकाणी खेळतात. मात्र, महापालिकेच्या शाळांमध्ये खो-खो चे खांब आणि डबलबार दिसत नाहीत. तसेच, क्रीडा साहित्यदेखील नसल्याने मुले सुट्टीत लपंडाव, पाठशिवणी खेळताना दिसतात. शाळांनी मैदानावर ॲथलेटिक्स, खो-खो, कबड्डी, क्रिकेट, हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल या खेळासाठी सुविधा उपलब्ध करुन द्यायची मागणी होत आहे.

### क्रीडा विकासाला बसली खीळ ...

» विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण घेत असतानाच चांगली क्रीडा मैदानेअसतील तर त्यांचा सरावही उत्तम होईल. महापालिकेने देखील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करण्यासाठी शाळांना मैदाने उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. महापालिका विद्यार्थ्यांची खेळासाठी कुचंबणा होत आहे. महापालिका शाळेत असलेल्या क्रीडाशिक्षकांना इतर कामे लावली जातात. तसेच,क्रीडाशिक्षक कमी असताना निवृत्तीनंतर रिक्त क्रीडाशिक्षकाचे पद भरले जात नाही. मुळात कला आणि क्रिडा हे सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे. शिक्षकांची पद भरली जात नसल्याने क्रीडा विकासाला खीळ बसली आहे.

“ आमच्याकडील 15 क्रीडाशिक्षक 2010 पासून इलेक्शन ड्युटीवर आहेत. दोन महिन्यांपूर्वी आम्ही त्यांची मागणी केली आहे. मात्र, निवडणूक विभागाने त्यांना अजून त्या कामातून मुक्त केलेले नाही. या शिक्षकांऐवजी पर्यायी शिक्षक मिळावेत, अशी त्यांची मागणी आहे. ते लवकर मिळतील, अशी अपेक्षा आहे. आणि मागेल त्या शाळांना 49 प्रकारचे क्रीडा साहित्य उपलब्ध करुन देऊ शकतो.

**– मिनीनाथ दंडवते, उपायुक्त क्रीडा विभाग**

# "सदानंदाचा येळकोट"!

## » भंडाऱ्याची उधळण करत खंडोबा आणि म्हाळसा मूर्तींना स्नान

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जेजुरीच्या खंडोबा देवाच्या सोमवती यात्रेसाठी सुमारे दोन लाख भाविकांनी गर्दी केली होती. सोमवारी सकाळी सात वाजता मुख्य इनामदार पेशवे, खोमणे,माळवदकर यांनी सूचना करताच खांदेकऱ्यांनी पालखी उचलून खांद्यावर घेतली. देव कऱ्हा नदीवर स्नानासाठी निघाले. पालखीची मंदिर प्रदक्षणा झाल्यावर त्यामध्ये पुजाऱ्यांनी खंडोबा म्हाळसादेवीच्या उत्सव मूर्ती आणून ठेवल्या.**



"सदानंदाचा येळकोट" असा जयघोष करीत भाविकांनी पिवळ्या धमक भंडाऱ्याची मुक्त उधळण केली.देवा तुझी सोन्याची जेजुरी या उक्तीप्रमाणे खंडोबा गड सोन्यासारखा उजळून निघाला. सनई चौघड्याच्या निनादात देवांचा पालखी सोहळा सुरू झाला. यावेळी बंदुकीच्या फैरी झाडून सलामी देण्यात आली.

खंडोबा देवस्थानचे मुख्य विश्वस्त पोपटराव खोमणे व इतर विश्वस्त यावेळी उपस्थित होते. पालखी गड उतरून खाली आली. ऐतिहासिक छत्री मंदिरमार्गे कऱ्हा नदीवर पोहोचली.पालखीच्या अग्रभागी मानाचा अश्व होता.धार्मिक वातावरणात पालखीतील खंडोबा माळसादेवीच्या मूर्तींना पवित्र कऱ्हा नदीतील पाण्याने स्नान घालण्यात आले.हा सोहळा अनुभवण्यासाठी हजारो भाविक उपस्थित होते.अडीच वाजता पालखी गावातील ग्रामदैवत जानुबाई मंदिरात आणून ठेवण्यात आली. यावेळी दर्शनासाठी मोठी गर्दी उसळली.रात्री सात वाजता पालखी पुन्हा खंडोबा गडावर आणण्यात आली. रोज मोरा (ज्वारी) वाटून पालखी सोहळ्याची सांगता करण्यात आली.

मागील सोमवती यात्रेत गडावरून पालखी खाली उतरताना चेंगराचेंगरी होऊन आठ जण जखमी झाले होते,त्यामुळे खंडोबा देवस्थान व पोलीस प्रशासन यांनी पालखी सोहळा व्यवस्थित पार पडण्यासाठी विशेष काळजी घेतली होती. पालखी अवजड असल्याने तिला खांदा देणारे खांदेकरी हे नेहमीचे व माहितगार असतात, अनेक भाविक मध्ये घुसून पालखीला खांदा देण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळे पालखी घसरून अपघात होतात म्हणून यावेळी चौदाशे खांदेकऱ्यांना रंगीत शर्ट देण्यात आले होते. आवश्यक तेथे पोलिसांनी अडथळे उभारून

### वाढीव दराने शिष्यवृत्तीचे वितरण


» दरवेळी सोमवती यात्रेत जेजुरीत भाविकांची हजारो वाहने येत असल्याने मुख्य रस्त्यावर वाहतुकीची प्रचंड कोंडी होऊन तास दीड तास लोकांना अडकून पडावे लागत होते. यावेळी जेजुरीचे पोलीस निरीक्षक बापूसाहेब सांडभोर यांनी मुख्य रस्त्यावर आवश्यक तेथे पोलीस बंदोबस्त ठेवला होता.रस्त्याच्या मध्यभागी लोखंडी कठडे उभारल्याने वाहतूक सुरळीत राहिली, तर अवजड वाहनांना पर्यायी मार्गाने वळवण्यात आले होते. राष्ट्रीय महामार्ग असलेल्या मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी अजिबात जाणवली नाही. दिवाळी व सोमवती यात्रा एकत्र आल्याने वाहनांची संख्या खूप होती.

# वडिलांना कोर्टात एकटं जाऊ देणार नाही!: सुप्रिया

## » निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात बंडखोरी झाली आणि फूट पडून शरद पवार गट आणि अजित पवार गटात पक्षावरील मालकीवरून वाद निर्माण झाला. यावर आता केंद्रीय निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार गटातील खासदार सुप्रिया सुळे यांनी हे खटले आणि त्याच्या सुनावणीवर प्रतिक्रिया दिली. यात त्यांनी ८० वर्षांच्या वडिलांना कोर्टात एकटं जाऊ देणार नाही, असं मत व्यक्त केलं. त्या सोमवारी (१३ नोव्हेंबर) एका सभेत बोलत होत्या.**







म्हणाल्या, "सगळ्या जबाबदाऱ्या असतात. माणूस सगळं तर करू शकत नाही. मुलं, नवरा, कुटुंब यांच्यासाठी ऑक्टोबरपर्यंत वेळच नाही. मतदारसंघ बघायचा, की पक्षाची कामं बघायची की कोर्टातील खटले बघायचे. शरद पवार स्वतः या कामांसाठी जातात. मात्र, जनाची नाही, पण मनाची तर आहे. ८० वर्षांच्या वडिलांना मी कोर्टात एकटं जाऊन देणार नाही." "मतदारसंघातील अर्धा वेळ खटले लढण्यात जात आहे. पहिल्यांदा सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. हारेंगे या जितेंगे, बाद में देखेंगे, मगर लढेंगे जरूर. आपल्याकडे म्हणतात कोर्टाची पायरी चढू नये. मात्र, आम्ही चढलो. आता एकदा कोर्टाची पायरी चढल्यावर उतरायचं नाही," असं मत सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केलं. दरम्यान, शरद पवार ओबीसी असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, शरद पवार गटाकडून या दाव्याचं खंडन करण्यात आलं आहे. शरद पवारांच्या कन्या व खासदार सुप्रिया सुळे यांनी हा दावाच मुळात हास्यास्पद असल्याची प्रतिक्रिया दिली. सुप्रिया सुळे म्हणाल्या, "तुम्ही त्या कंपनीचं नाव बघितलंय का? हा बालिशपणा चाललाय", असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. "हा सगळा प्रकार हास्यास्पद आहे. शरद पवार दहावीला होते, त्यावेळेस इंग्रजीमधून प्रमाणपत्र दिले जात नव्हते. पवार दहावीला होते तेव्हा त्यांचा दाखला इंग्रजीत असू शकतो का? आजकाल खोटी प्रमाणपत्रे बाजारामध्ये सर्रास मिळतात."

### शरद पवार ओबीसी असल्याचा दावा

» माणूस सगळं तर करू शकत नाही. मुलं, नवरा, कुटुंब यांच्यासाठी ऑक्टोबरपर्यंत वेळच नाही. मतदारसंघ बघायचा, की पक्षाची कामं बघायची की कोर्टातील खटले बघायचे. शरद पवार स्वतः या कामांसाठी जातात. मात्र, जनाची नाही, पण मनाची तर आहे. ८० वर्षांच्या वडिलांना मी कोर्टात एकटं जाऊन देणार नाही." "मतदारसंघातील अर्धा वेळ खटले लढण्यात जात आहे. पहिल्यांदा सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. हारेंगे या जितेंगे, बाद में देखेंगे, मगर लढेंगे जरूर. आपल्याकडे म्हणतात कोर्टाची पायरी चढू नये. मात्र, आम्ही चढलो. आता एकदा कोर्टाची पायरी चढल्यावर उतरायचं नाही," असं मत सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केलं. दरम्यान, शरद पवार ओबीसी असल्याचा दावा केला जात आहे.

# वसंतदादा महाराष्ट्राचे विकासपुरुष!

## » वसंतदादा पाटील यांनी सहकार क्षेत्राला निर्णायक वळण दिले : अतिरिक्त आयुक्त जगताप

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी चिंचवडः महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील हे (PIMPRI) थोर स्वातंत्र्यसैनिक, देशभक्त आणि सहकार क्षेत्रातील अग्रणी नेते होते. त्यांनी 4 वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषवून महाराष्ट्रासाठी अनेक लोकहितकारक निर्णय घेतले, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी केले.**



महाराष्ट्र माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त जुनी सांगवी येथील त्यांच्या पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना, स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच्या विविध प्रकारच्या अनुभवांचे संचित, नेतृत्वगुण, संघटनकौशल्य, निर्णयक्षमता, शेतकरी व ग्रामीण समाजजीवनाची अचूक, परिपूर्ण जाणीव इत्यादी गुणांच्या आधारे वसंतदादांनी महाराष्ट्राचा विकास साधला, असेही अतिरिक्त आयुक्त जगताप म्हणाले.

विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्याधिकारी सतिश पाटील, आरोग्य निरिक्षक धनश्री जगदाळे, कनिष्ठ अभियंता जितेंद्र अहिरे, तसेच सामाजिक कार्यकर्ते रविंद्र भोसले, सुहास वेदपाठक उपस्थित होते.

महाष्ट्रातील सहकार क्षेत्राला निर्णायक वळण देऊन विकास साधणारे नेते तसेच क्रांतिकारक, स्वातंत्र्यसैनिक, विधायक कार्य करणारे नेते म्हणून वसंतदादा पाटील यांची ओळख होती. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडविली.

### वसंतदादांनी घेतले अनेक महत्त्वाचे निर्णय

वसंतदादा पाटील यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिल्या तसेच शालेय विद्यार्थ्यांना मोफत एसटी प्रवास, परगावी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जेवणाच्या डब्यांची मोफत वाहतूक, शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्जपुरवठा असे अनेक महत्वाचे निर्णय त्यांनी आपल्या कारकिर्दीत घेतले.

---

# 'वॉर्ड अॅण्ड सिटी हेल्थ अॅक्शन प्लॅन' अंतर्गत टास्क फोर्स!

## » समितीचे अध्यक्ष म्हणून क्षेत्रीय अधिकाऱ्यांची निवड

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**वॉर्ड हेल्थ अॅक्शन प्लान- टास्क फोर्स समितीचे कामकाज कार्यक्षमतेने होण्याकरिता व महापालिकेच्या प्रत्येक रुग्णालय तसेच दवाखाने यांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्यांचा निपटारा क्षेत्रीय कार्यालय स्तरावर करण्यासाठी वॉर्ड हेल्थ अॅक्शन प्लॅन- टास्क फोर्स समितीचे अध्यक्ष म्हणून क्षेत्रीय अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त क्षेत्रीय कार्यालयांना आर्थिक स्वरूपाचे वित्तीय अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली.**

मार्गदर्शक सूचनांनुसार अॅक्शन प्लॅन तयार (PIMPRI) करण्यासाठी युनिसेफ व यशदा या संस्थांसमवेत बैठका घेवून वैद्यकीय विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. महापालिकेच्या भौगोलिक कार्यक्षेत्र कामकाजाचे सोईनुसार निवडणूक वॉर्डनिहाय आठ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये विभागण्यात आले आहेत.

वैद्यकीय विभागामार्फत राष्ट्रीय कार्यक्रमाच्या अंमलबजावणी करीता 8 रुग्णालय झोन स्तरावर निश्चित करण्यात आले आहेत. वॉर्ड हेल्थ अॅक्शन प्लॅन तयार करण्यासाठी क्षेत्रीय (PIMPRI) कार्यालयस्तरावर क्षेत्रीय अधिकारी यांना वित्तीय अधिकार प्रदान करून वॉर्ड हेल्थ अॅक्शन प्लॅनच्या अनुषंगाने सर्व कामकाज करण्यात येणार आहे. हे कामकाज करण्याकरिता संबंधित रुग्णालयाचे ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी, क्षेत्रीय कार्यालयाची



आराखडा तयार करण्याकरिता समितीची स्थापना...

**» वॉर्ड अॅन्ड सिटी हेल्थ अॅक्शन प्लॅनमधील तत्त्वे भविष्यात महाराष्ट्रात मार्गदर्शक व दिशादर्शक म्हणून वापरण्यात येणार आहेत. हा आराखडा तयार करण्याकरिता 'वॉर्ड हेल्थ अॅक्शन प्लॅन टास्क फोर्स' समितीची स्थापना करण्यात आली आहे.**

कार्यकारी अभियंता, स्थापत्य, पाणीपुरवठा, ड्रेनेज व क्षेत्रीय अधिकारी यांची संयुक्तपणे समिती स्थापन केली आहे.

राज्यातील प्रत्येक महापालिकेने राष्ट्रीय आरोग्य प्रणाली संसाधन केंद्र (एनएचएसआरसी) द्वारे प्रदान केलेल्या सिटी हेल्थ अॅक्शन प्लॅन आराखड्यावर काम करावे, अशा सूचना राज्य शासनामार्फत दिल्या गेल्या आहेत. त्यानुसार महापालिका स्तरावर 'वॉर्ड अॅण्ड सिटी हेल्थ अॅक्शन प्लॅन' तयार करण्याकरिता युनिसेफच्या मदतीने प्रायोगिक तत्वावर पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवड करण्यात आली आहे.

---

# लहुजी साळवे यांच्या जयंतीनिमित्त आज प्रबोधनात्मक कार्यक्रम

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीनेक्रांतिवीर वस्ताद लहुजी साळवे यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन मंगळवार 14 नोव्हेंबर रोजी चिंचवड स्टेशन येथील पेट्रोल पंपाशेजारील जागेत करण्यात आले आहे.

महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील (Pimpri)क्रांतिगुरू वस्ताद लहुजी साळवे यांच्या प्रतिमेस सकाळी 10.30 वाजता करून अभिवादन करण्यात येणार असून 11 वाजता चिंचवड स्टेशन येथील पुतळ्यास आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी 11.15 वाजता पुतळ्याशेजारी शाहीर बापू पवार यांचा शाहिरी कार्यक्रम पार पडणार आहे.

शाहिरी कार्यक्रम पार पडल्यानंतर दुपारच्या(Pimpri) पर्वात 12.15 वाजता गायक लखन अडागळे यांचा प्रबोधनपर गीतांचा कार्यक्रम तर दुपारी 2 वाजता गायक निलेश देवकुळे यांचा प्रबोधनपर गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दुपारच्या पर्वानंतर खास महिलांसाठी सायंकाळी 4 वाजता 'न्यू होम मिनीस्टर- खेळ पैठणीचा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर पुन्हा सायंकाळी 6 वाजता गायक चंद्रकांत नगरकर यांचा प्रबोधनपर गीतांचा कार्यक्रम पार पडणार आहे. तरी शहरवासीयांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.




**बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी माफी मागितल्यानंतरही, स्त्री-पुरुषसंबंधांबाबत बिहार विधिमंडळात त्यांनी केलेल्या ग्राम्य टिप्पणीमुळे वादाचे मोहोळ उठले, हे नजरेआड करता येत नाही. नितीश यांच्यासारख्या अनुभवी, सत्तरी गाठलेल्या नेत्याने ही अशी विधाने- तीही भर सभागृहात करावीत, ही संसदीय गांभीर्याचीच नव्हे तर व्यक्तिगत नीतिमत्तेचीही पायमल्ली आहे.**

# कुठे नितीश आणि कुठे लोहिया..



काही जणांनी ही विधाने हसण्यावारी नेण्याचा प्रयत्न चालवला आहे, ही भाषा हे बिहारी रगेलपणाचे लक्षण आहे असे त्यांचे म्हणणे आहे आणि त्यासाठी त्यांनी लालू प्रसाद यादव यांच्यासारख्या नेत्यांच्या भाषेकडे बोट दाखवले आहे. पण लालू प्रसाद कसेही बोलत असले तरी त्यांनी स्त्रियांबद्दल कधीही अनुदार उद्गार काढले नव्हते. नितीशकुमार यांच्या टिप्पणीने मात्र जी काही नीचतम पातळी गाठली, त्यामुळे सभागृहातील प्रत्येक महिलेला धक्का बसला, काही जणींना तर अश्रू अनावर झाले. अशा वेळी नितीश यांचे पुरुष सहकारी- अगदी तेजस्वी यादवसुद्धा, मागच्या बाकांवरून नितीश यांच्या वक्तव्याला आणि हातवाऱ्यांना हसून दाद देत होते, हेही कसे विसरता येईल? तेजस्वी यादवांनी नंतर सारवासारव करताना नितीश यांचे ते वक्तव्य एक प्रकारे लैंगिक शिक्षणासारखेच ठरले, असे म्हटले असले तरी विधानसभा म्हणजे काय शाळा आहे का? त्याहीपेक्षा अस्वस्थ करणारा कोन या वक्तव्याला आहे, तो त्यामागच्या पुरुषसत्ताक मानसिकतेचा. नितीशकुमार यांचे वक्तव्य निषेधार्हच आहे, हे माहीत असूनही महिलांना केवळ मुलांना जन्म देणारे यंत्रच समजणारी ही मानसिकता अनेकांना मान्यच असते ही वस्तुस्थिती आणि तिचा त्रास लाखो महिलांना होतो आहे. नितीशकुमार हे एवढे अंतर्बाह्य समाजवादी, पण 'पतीला विशिष्ट क्षणी संभोग थांबवण्याची विनंती करणे' इतकीच सुशिक्षित स्त्रीच्या स्वातंत्र्याची त्यांची कल्पना? याउलट, दिवंगत समाजवादी नेते राम मनोहर लोहिया यांचा 'स्त्रिया आणि लैंगिक शुद्धता' हा लेख पाहा. त्या लेखात लोहिया यांनी पुरुषांना महिलांची क्षमता आणि कार्यक्षमता दिसतच नाही, फक्त तिचे लैंगिक अवयव दिसतात, अशी टीका केली आहे. लोहियांनीच 'द्रौपदी व सावित्री' या शीर्षकाच्या आणखी एका लेखात,

द्रौपदीला 'भारतीय स्त्रीत्वाची खऱ्या अर्थाने प्रतिमा' ठरवले आहे. द्रौपदी 'ज्ञानी, शूर, धीट आणि नखशिखान्त स्वाभिमानी' होती, ही लोहियांच्या मते जागृत, सक्षम स्त्रीची लक्षणे ठरतात, द्रौपदीला नवरे किती होते हे पाहू नका, तर तिने स्वत:चे व्यक्तित्व आणि स्वाभिमान कसा जपला यातून शिका, असे लोहियांचे म्हणणे आहे. तरीही आपण मान्य करू की नितीशकुमार यांची चिंता खरी असू शकते. लोकसंख्या नियंत्रण हे एक ज्वलंत आव्हान आहेच. बिहार तर सर्वाधिक २५ टक्के लोकसंख्यावाढीसह अन्य राज्यांहून अधिकच भर या समस्येत घालतो आहे. याचा मुकाबला करण्यासाठी महिलांनी साक्षर व्हावे अशी त्यांची इच्छा.. म्हणजे एवढ्याचसाठी साक्षर व्हावे? तिचे कर्तृत्व तिने गाजवूच नये? भारताची वाढती लोकसंख्या ही समस्या आहेच. चीनच्या १४२.५ कोटींपेक्षाही ३० लाखांनी अधिक, म्हणजे जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश आपण आहोत. या प्रश्नावर २०१९ मधील स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही चिंता व्यक्त केली. परंतु त्यांनी गर्भधारणा टाळणे हे केवळ स्त्रीचेच कर्तव्य ठरवले नाही, उलट 'मुलाला जगात आणण्यापूर्वी, आपण मुलाला न्याय देऊ शकू की नाही' याचा विचार दोघाही पालकांनी- म्हणजे पुरुषांनीसुद्धा करणे आणि दोघांनी थांबणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले होते. मोदींनी याचा संबंध सामाजिक दक्षतेशी जोडला होता आणि लहान कुटुंब असण्याला 'देशभक्तीचा एक प्रकार' असे म्हटले होते. लोकसंख्या नियंत्रणाच्या चर्चेला पुरुषसत्ताकतेच्या आणि ध्रुवीकरणाच्या मानसिकतेपासून दूरच ठेवले पाहिजे, ही समाजातील सर्व घटकांची जबाबदारी आहे. संख्यात्मक श्रेष्ठतेच्या स्पर्धेसाठी स्त्रियांकडे 'प्रजनन यंत्र' म्हणून पाहाणे आणि गर्भाशयाला रणांगण मानून जग जिंकू पाहणे, हा मानवतेला शाप आहे. लोकसंख्या नियंत्रणाच्या चर्चेला या घृणास्पद आणि स्त्रीविरोधी मानसिकतेतून बाहेर काढण्याची गरज आहे.

## संपादकीय »

### तोतरेपणास तिलांजली?

***सरकारने संयुक्त राष्ट्र आमसभेच्या समितीत पॅलेस्टिनी भूमीतील जमीन बळकावण्याच्या इस्रायलच्या धोरणास विरोध करणाऱ्या ठरावाच्या बाजूने मतदान केले.***

सर्वप्रथम भारत सरकारचे अभिनंदन. आपल्या सरकारने संयुक्त राष्ट्र आमसभेच्या समितीत पॅलेस्टिनी भूमीतील जमीन बळकावण्याच्या इस्रायलच्या धोरणास विरोध करणाऱ्या ठरावाच्या बाजूने मतदान केले. म्हणजे आपण इस्रायलच्या विरोधात भूमिका घेतली. भारत सरकारची ही कृती सर्वार्थाने अभिनंदनास पात्र ठरते. यामागे प्रमुख कारणे दोन. एक म्हणजे इस्रायलचे दांडगेश्वर पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांचे राजकीय चारित्र्य सांभाळणे ही जणू आपलीच जबाबदारी असल्याच्या थाटात गेला महिनाभर आपल्याकडे एका वर्गाचे वर्तन होते. या अशा स्थानिक, समाजमाध्यमी अर्धवटरावांची अजिबात फिकीर भारत सरकारने बाळगली नाही आणि आपल्या या भूमिकेमुळे विचारांधळ्यांचा मोठा वर्ग तोंडावर आपटेल याचाही विचार आपल्या सरकारने केला नाही. आंतरराष्ट्रीय भूमिका देशी वावदूक काय म्हणतात याचा विचार करून घ्यावयाची नसते.

**विश्वचषक २०२३ स्पर्धेचा साखळी टप्पा भारत वि. नेदरलँड्स सामन्याने रविवारी समाप्त झाला. भारतीय क्रिकेट संघाने दीपावलीच्या पहिल्या दिवशी सामना संपल्यानंतर सहकुटुंब दिवाळी साजरी केली. तशाच प्रकारच्या उत्सवी आणि निवांत वातावरणात भारतीय संघ दुपारी मैदानात उतरला होता आणि पूर्ण ताकद न लावताही नेदरलँड्स संघाविरुद्ध मोठ्या फरकाने जिंकला.**

# आता विश्वविजेतेपदच हवे!

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये फार संधी न मिळणाऱ्या आणि अजूनही मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित क्रिकेटपटूंवर अवलंबून राहणाऱ्या नेदरलँड्स संघाला तरीही स्वत:च्या कामगिरीने समाधान वाटले असेल. कारण भारताविरुद्ध फारच थोड्या संघांनी या स्पर्धेत अडीचशे धावा किंवा त्यापलीकडे मजल मारलेली आहे. अर्थात ४०० धावांचा डोंगर उभा केल्यानंतर भारतीय गोलंदाजांनी पूर्ण ताकदीनिशी गोलंदाजी केली नाही हेदेखील त्यामागील एक कारण असावे. या पूर्णतया बिनमहत्त्वाच्या सामन्यात प्रमुख गोलंदाजांना विश्रांती मिळावी या उद्देशाने कर्णधार रोहित शर्मा, विराट कोहली, शुभमन गिल, सूर्यकुमार यादव या मूळच्या फलंदाजांनी गोलंदाजी केली. येत्या बुधवारी होत असलेल्या उपान्त्य फेरीच्या सामन्यासाठी प्रमुख गोलंदाज ताजेतवाने राहाणे भारतासाठी आवश्यक होते. सलग नऊ सामने जिंकून भारत उपान्त्य




फेरीत दाखल झाला आहे. उपान्त्य फेरीत भारताची गाठ विश्वचषक स्पर्धेत नेहमीच धोकादायक मानल्या गेलेल्या न्यूझीलंड संघाशी आहे. गेल्या खेपेस इंग्लंडमध्ये झालेल्या स्पर्धेत याच संघाने भारताचा याच टप्प्यावर धक्कादायक पराभव केला होता. त्या कटू आठवणीची पुनरावृत्ती होऊ नये अशी असंख्य क्रिकेटप्रेमींची इच्छा आहे. पण त्या भारतीय संघाच्या तुलनेत विद्यमान भारतीय संघ अधिक तयारीत आहे, ही बाब नजरेआड करता येत नाही.

सलग नऊ विजय ही निव्वळ आकडेवारी नाही. यापूर्वी दिग्विजयी ऑस्ट्रेलियन संघाने २००३ आणि २००७ या स्पर्धांमध्ये प्रत्येकी सलग ११ विजय मिळवले होते. त्या विक्रमाची बरोबरी करायची, तर भारताला विश्वविजेतेपदच पटकवावे लागेल. पण ऑस्ट्रेलियाच्या त्या विजयमालिकेपेक्षाही भारताने या स्पर्धेत आतापर्यंत मिळवलेले विजय अधिक एकतर्फी आहेत. त्याची कारणे अनेक आहेत. भारताची सिद्धता हे प्रमुख कारण आहे. सहा महिन्यांपूर्वी भारतीय संघाच्या क्षमतेविषयी प्रश्न उपस्थित केले जात होते. त्यातील काही रास्त होते. परंतु प्रशिक्षक राहुल द्रविड आणि कर्णधार रोहित शर्मा यांच्यावर निवड समिती आणि भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने पूर्ण विश्वास ठेवला आणि संघनिवडीचे स्वातंत्र्यही दिले. राहुल-रोहित यांनीही प्रत्येक खेळाडूकडून नेमके काय हवे आहे याचा विचार करून संघबांधणी केली. जसप्रीत बुमरा, श्रेयस अय्यर, हार्दिक पंड्या यांना दुखापतींतून बरे होण्यासाठी पुरेसा वेळ दिला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# चरणदास दादागिरी दाखवू शकत नाहीत!

## » विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवारांची पवारांवर टोलेबाजी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुतीत सामील झाल्यानंतर अवघ्या चारच महिन्यात उपमुख्यमंत्री अजित पवार सत्तेत नाराज असल्याची चर्चा आहे. अजित पवार यांनी दोन दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची दिल्लीत भेट घेतली. या भेटीत अजित पवारांनी आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवल्याचंही बोललं जात आहे.**

शिंदे गटाला अधिक विकास निधी दिला जातो तर अजित पवार गटाला तुलनेनं कमी विकास निधी दिला जातो, अशी तक्रार अजित पवारांनी अमित शाहांकडे केल्याचं समजत आहे. निधी वाटपावरून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी अजित पवारांवर टोलेबाजी केली आहे. महाविकास आघाडी सरकारमध्ये असताना सगळ्यांना धाक दाखवून सर्व तिजोरी साफ करत होतात. आता तशीच धमक अजित पवारांनी दाखवावी. निधी मिळत नाही, म्हणून रडण्यापेक्षा दुसऱ्यांना रडवण्याची हिंमत आहे का? असा सवालही वडेट्टीवार यांनी अजित पवारांना विचारला आहे. ते नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. अजित पवारांच्या नाराजीबाबत विचारलं असता विजय वडेट्टीवार म्हणाले, "अजित पवार कधी खूश असतात? ते नेहमीच नाराज असतात. त्यांच्या मनाप्रमाणे झाले, तर ते खूश होतात. मनाविरुद्ध झाले, तर नाराज. 'हम करे सो कायदा'अशा पद्धतीने त्यांची भूमिका असते. आता तीन पक्षांच्या सरकारमध्ये त्यांना वाटतं की, निधी मिळत नाही. अरे तिजोरीची चावीच तुमच्याकडे आहे, मग तुम्ही दुसऱ्यांकडे तक्रार का करता? आता तुमची धमक दाखवा." "आघाडी सरकारमध्ये धाक दाखवून सर्व तिजोरी साफ करत होतात. तीच धमक आता अजित पवारांनी दाखवावी. निधी मिळत नाही, म्हणून रडण्यापेक्षा दुसऱ्यांना रडवण्याची हिंमत आहे का? हे अजित पवारांनी दाखवण्याची गरज आहे. आमचे संजय राऊत म्हणतात त्याप्रमाणे अजित पवार दिल्लीचे चरणदास झाले आहेत.



### दुसऱ्यांना रडवण्याची हिंमत आहे का?

» महाविकास आघाडी सरकारमध्ये असताना सगळ्यांना धाक दाखवून सर्व तिजोरी साफ करत होतात. आता तशीच धमक अजित पवारांनी दाखवावी. निधी मिळत नाही, म्हणून रडण्यापेक्षा दुसऱ्यांना रडवण्याची हिंमत आहे का? असा सवालही वडेट्टीवार यांनी अजित पवारांना विचारला आहे. ते नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. अजित पवारांच्या नाराजीबाबत विचारलं असता विजय वडेट्टीवार म्हणाले, "अजित पवार कधी खूश असतात? ते नेहमीच नाराज असतात. त्यांच्या मनाप्रमाणे झाले, तर ते खूश होतात. आता तीन पक्षांच्या सरकारमध्ये त्यांना वाटतं की, निधी मिळत नाही. अरे तिजोरीची चावीच तुमच्याकडे आहे, मग तुम्ही दुसऱ्यांकडे तक्रार का करता?

### अजितदादा गटाची दिवाळी अस्वस्थतेत, निधी मिळत नाही आमदारांच्या तक्रारी

» राष्ट्रवादीचा एक गट घेऊन अजित पवार मिंधे सरकारमध्ये सहभागी झाले खरे, पण ऐन दिवाळीत अजितदादा गटात अस्वस्थतेचे फटाके फुटू लागले आहेत. निधी मिळत नसल्याची फुटीर आमदारांची तक्रार आहे. शिवसेनेशी गद्दारी करून शिंदे गटात गेलेल्या आमदारांनी महाविकास आघाडी सरकारमधून बाहेर पडताना उपमुख्यमंत्री अजित पवार निधी वाटपात दुजाभाव करत असल्याची तक्रार केली होती. आता त्याच अजितदादांवर दिल्लीत गृह मंत्री अमित शहांसमोर रडण्याची वेळ आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी झालेल्या अजित पवार यांना अर्थ खाते देण्यास शिंदे गटाच्या आमदारांनी कडाडून विरोध केला होता. पण त्यांनी आपलं राजकीय कौशल्यशल्य पणास लावत अर्थ खात्यासह महत्त्वाची खाती आपल्या गटाच्या पदरात पाडून घेतली. यामुळे शिंदे गट आणि भाजपात कमलाची नाराजी आहे. त्यातच आता शिंदे गट आणि भाजपच्या मंत्र्यांकडून आर्थिक कोंडी होत असल्याने अजितदादा गटाच्या आमदारांची घालमेल वाढू लागली आहे. त्यामुळे तीन तिघाडा काम बिघाडा अशीच काहीशी अवस्था शिंदे सरकारमध्ये सहभागी पक्षांची झाली आहे.

# शुल्कमाफीच्या थकबाकीची शैक्षणिक संस्थांना अंतरिम रक्कम द्या!

## » उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आर्थिक ताण कमी करण्याच्या दृष्टीने शुल्कमाफीच्या थकबाकीची एकूण ३,६०१.६६ कोटी रुपये अंतरिम रक्कम म्हणून शैक्षणिक संस्थांना देण्याचे आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शुल्कमाफी देणाऱ्या विविध योजनांसाठी मुख्य विभाग म्हणून काम करणाऱ्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने त्याबाबतचा प्रस्ताव मुख्य सचिवांकडे पाठवावा, असे आदेशही न्यायमूर्ती नितीन जामदार आणि न्यायमूर्ती मंजूषा देशपांडे यांच्या खंडपीठाने दिले आहेत.**

राज्य सरकारने २००६-०७ या शैक्षणिक वर्षांपासून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास वर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शुल्कमाफी दिली आहे. तथापि, दीर्घकाळापासून शुल्कमाफीच्या परताव्याची रक्कम देण्यात आली नसल्याचा मुद्दा उपस्थित करून थकीत शुल्कमाफी परताव्यासाठी विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, वैयक्तिक संस्थांसह काही शैक्षणिक संस्थांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाला मुख्य विभाग म्हणून नियुक्त केले होते. त्यानंतर, गेल्या आणि सुरू आर्थिक वर्षांसाठी शैक्षणिक संस्थांना देणे असलेली ३,६०१.६६ कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित असल्याचे विभागाने न्यायालयात सांगितले होते. त्याची दखल घेऊन सरकारने प्रत्येक शैक्षणिक संस्थेला थकबाकीचा परतावा म्हणून अंतरिम रक्कम देणे गरजेचे असल्याचे न्यायालयाने म्हटले. तांत्रिक आव्हाने असल्याचे मान्य केले तरी, शैक्षणिक संस्थांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असल्याकडे लक्ष वेधून थकबाकीचा परतावा म्हणून अंतरिम रक्कम देण्याबाबत २९ नोव्हेंबरपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश न्यायालयाने सरकारला दिले आहेत.

### मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शुल्कमाफी

» राज्य सरकारने २००६-०७ या शैक्षणिक वर्षांपासून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास वर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शुल्कमाफी दिली आहे. या योजनांतर्गत, सरकार शैक्षणिक संस्थांना त्यांच्या शुल्कमाफीच्या रकमेचा परतावा देते. तथापि, दीर्घकाळापासून शुल्कमाफीच्या परताव्याची रक्कम देण्यात आली नसल्याचा मुद्दा उपस्थित करून थकीत शुल्कमाफी परताव्यासाठी विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, वैयक्तिक संस्थांसह काही शैक्षणिक संस्थांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

# आपलं सरकार आल्यानंतर करोना गेला : मुख्यमंत्री



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

शिंदेंच्या शिवसेनेतील नेते नरेश मस्के यांनी सोमवारी ( १३ नोव्हेंबर ) दिवाळी पहाट कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. येथे 'आई कुठे काय करते' आणि 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमातील कलाकारांनी हजेरी लावली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी दोन्ही मालिकेतील कलाकारांचं कौतुक केलं आहे. तेव्हा अभिनेते समीर चौगुलेंनी म्हटलं, 'ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन माझे चाहते ( फॅन ) आहेत.' यावर मुख्यमंत्री शिंदे समीर चौगुलेंना म्हणाले, 'मी सुद्धा तुमचा चाहता ( फॅन ) आहे.' मुख्यमंत्र्यांनी म्हटलं, "कधी अचानक घरी आल्यावर हास्यजत्रा कार्यक्रम चालू असतो. तेव्हा थोडावेळा का होईना मी तो कार्यक्रम पाहतो. राज्यकारभार करताना कधी काय होईल आणि कधी काय कोण बोलेल, सांगू शकत नाही. त्यामुळे आम्ही गॅसवर असतो. तारेवरची कसरत करावी लागते." "करोनाकाळात सगळ्यांनी चांगलं काम केलं आहे. आपलं सरकार आल्यानंतर करोना पळून गेला. मी एकही बैठक घेतली नाही. मी बैठका घेत बसलो असतो, तर करोनाचा बाऊ झाला असता. काही लोकांना तो हवा होता," असा टोला मुख्यमंत्र्यांनी उद्धव ठाकरेंना लगावला आहे.

# न्यायालयाचा फटाकेबंदीचा आदेश धाब्यावर!

## दिल्लीमध्ये लक्ष्मीपूजनाच्या दिवशी मोठ्या प्रमाणात फटाके फोडले

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**दिल्ली (DELHI) आणि एनसीआरमध्ये दिवाळीत फटाक्यांवर बंदी असतानाही मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतषबाजी करत नियम धाब्यावर बसवण्यात आले. दिवाळी हा हिंदू धर्मातील महत्त्वाचा सण आहे. दिवाळीत घरोघरी रांगोळी काढली जाते आणि आनंद साजरा करण्यासाठी फटाक्यांची आतषबाजीही केली जाते.**



मात्र, दिल्लीत वाढत्या प्रदूषणामुळे सुप्रीम कोर्टाने दिवाळीत फटाके फोडण्यावर पूर्णपणे बंदी घातली आहे. एखाद्या व्यक्तीने फटाके फोडल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते. असं असलं तरी, दिल्लीतील नागरिकांनी मात्र सर्वोच्च न्यायालयाचा आदेश धाब्यावर बसवला.

दिल्लीमध्ये लक्ष्मीपूजनाच्या दिवशी मोठ्या प्रमाणात फटाके फोडले गेले.

दिवाळीच्या आधीच दिल्लीमध्ये प्रदूषणात प्रचंड वाढ झाली होती. दिल्ली एनसीआरमधील प्रदूषणामुळे सर्वोच्च न्यायालयाने फटाक्यांवर बंदी घातली होती, मात्र त्यानंतरही दिवाळीत अनेक भागात फटाके फोडून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करण्यात आले. रविवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास फटाक्यांची आतषबाजी वाढली. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत ते कमीच राहिले. रविवारी, 12 नोव्हेंबरला लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सकाळपासूनच अनेक भागात फटाक्यांची आतषबाजी सुरू झाली, त्याचं प्रमाणे संध्याकाळपर्यंत वाढत गेले. इतकंच नाही तर, अगदी मध्यरात्रीपर्यंत फटाके फोडण्याच्या प्रमाणात मोठी वाढ झाली. काही सेकंदांच्या अंतराने 90 डेसिबलची आवाज मर्यादा ओलांडणाऱ्या फटाक्यांचा आवाज रात्री 10 वाजेपर्यंत दिल्लीत जवळपास प्रत्येक भागासह ऐकू येत होता. फटाक्यांच्या आतषबाजीमुळे दिल्लीतील प्रदूषणातही अनेक पटींनी वाढ झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून दिल्लीतील हवेची पातळी घसरली होती,

### फटाके फोडण्याच्या प्रमाणात वाढ

» दिवाळीच्या आधीच दिल्लीमध्ये प्रदूषणात प्रचंड वाढ झाली होती. दिल्ली एनसीआरमधील प्रदूषणामुळे सर्वोच्च न्यायालयाने फटाक्यांवर बंदी घातली होती, मात्र त्यानंतरही दिवाळीत अनेक भागात फटाके फोडून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करण्यात आले. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत ते कमीच राहिले. रविवारी, 12 नोव्हेंबरला लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सकाळपासूनच अनेक भागात फटाक्यांची आतषबाजी सुरू झाली, त्याचं प्रमाणे संध्याकाळपर्यंत वाढत गेले. अगदी मध्यरात्रीपर्यंत फटाके फोडण्याच्या प्रमाणात मोठी वाढ झाली. काही सेकंदांच्या अंतराने 90 डेसिबलची आवाज मर्यादा ओलांडणाऱ्या फटाक्यांचा आवाज रात्री 10 वाजेपर्यंत दिल्लीत जवळपास प्रत्येक भागासह ऐकू येत होता.

आता फटाक्यांमुळे हवेची गुणवत्ता आणखी घसरली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्याआकडेवारीनुसार, सोमवारी सकाळी दिल्लीतील हवा गुणवत्ता निर्देशांक होता, ही आकडेवारी सामान्यपेक्षा सहापट जास्त आहे. CPCB - PM 2.5 नुसार, लोनी गाझियाबादमध्ये सकाळी 6 वाजता AQI (AIR QUALITY INDEX) 414 होता, तर नोएडा सेक्टर 62 मध्ये AQI 488, पंजाबी बाग - 500 आणि रोहिणीमध्ये AQI 456 होता.

# मोदींना लक्ष्य करत काँग्रेसचं कँपेन

## मोदीविरुद्धात राजा असं कँपेन सुरु केलं

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभा निवडणुकांचे घोडामैदान जवळ आलं आहे. अवघ्या काही महिन्यांमध्ये लोकसभा निवडणूक होईल. त्यासाठीची तयारी करण्यासाठी विरोधकांनी कंबर कसली आहे. सोशल मीडियावरुनही विरोधक मोदींना आणि भाजपा विरोधकांना लक्ष्य करते आहे. अशात काँग्रेसने डरपोक राजा असं कँपेन सुरु केलं आहे.**



### लढणार आणि जिंकणारही

» विरोधकांना घाबरवण्यासाठी हा राजा ईडी, आयटी आणि सीबीआयच्या अधिकाऱ्यांना पाठवतो. मात्र काँग्रेस पक्ष कुणालाच घाबरत नाही. कारण काँग्रेस हा तो पक्ष आहे ज्याने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं. तसंच इंग्रजांना धूळ चारली. आम्ही इंग्रजांना घाबरलो नाही तर त्यांच्या गुलामांना कसे घाबरु? काँग्रेस पक्षाचे लीडर निडर आहेत. त्यामुळे आम्ही सांगतो मुळीच घाबरु नका. ही लढाई देशाची लोकशाही वाचवण्यासाठीची आहे. ही लढाई आपण लढणार आणि जिंकणारही. जय हिंद! या आशयाचा हिंदी मेसेज करत काँग्रेसने मोदींचा उल्लेख डरपोक राजा असा केला आहे.

आपल्या देशात एक डरपोक राजा आहे. त्याला भीती वाटली की तो घाबरतो आणि शांत बसतो. हरणं त्या राजाला आवडत नाही त्याला भीती वाटते. निवडणूक आली की काँग्रेसच्या विजय होणार या भीतीने तो राजा गर्भगळीत होतो. तो राजा म्हणजे हुकुमशाह आहे, तो एक ढोंगी आहे, तो एक डरपोक आहे. त्यामुळेच हा राजा सरकारी एजन्सींचा दुरुपयोग करतो.

विरोधकांना घाबरवण्यासाठी हा राजा ईडी, आयटी आणि सीबीआयच्या अधिकाऱ्यांना पाठवतो. मात्र काँग्रेस पक्ष कुणालाच घाबरत नाही. कारण काँग्रेस हा तो पक्ष आहे ज्याने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं. तसंच इंग्रजांना धूळ चारली. आम्ही इंग्रजांना घाबरलो नाही तर त्यांच्या गुलामांना कसे घाबरु? काँग्रेस पक्षाचे लीडर निडर आहेत. त्यामुळे आम्ही सांगतो मुळीच घाबरु नका. ही लढाई देशाची लोकशाही वाचवण्यासाठीची आहे. ही लढाई आपण लढणार आणि जिंकणारही. जय हिंद! या आशयाचा हिंदी मेसेज करत काँग्रेसने मोदींचा उल्लेख डरपोक राजा असा केला आहे. काँग्रेसने हे कँपेन सुरु केलंय जे सोशल मीडियावर अनेकांनी रिपोस्टही केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तपासयंत्रणांचा गैरवापर करतात असा आरोप राहुल गांधी आणि काँग्रेस नेत्यांनी याआधीही केला आहे. आता या व्हिडीओतून पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदींना लक्ष्य करण्यात आलं असून त्यांचा उल्लेख डरपोक राजा असा करण्यात आला आहे. यावर भाजपाकडून काय उत्तर दिलं जाणार? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. काही वर्षांपूर्वी नरेंद्र मोदी म्हणाले होते की नोटबंदी केली की काळा पैसा बाहेर येईल आणि संपुष्टात येईल.

काळा पैसा मिटला का? उलट वाढला. त्यांनी म्हटलं होतं GST आणतो, देशाची प्रगती होईल. जीएसटीचा कुणाला फायदा झाला का? उलट महागाई वाढली. काँग्रेसच्या कार्यकाळात ४०० रुपयांचा सिलिंडर मिळत होता आज किंमत किती झाली? १२०० रुपये. नरेंद्र मोदी म्हणाले होते १५ लाख रुपये प्रत्येकाच्या अकाऊंटमध्ये जमा होतील. शेतकऱ्यांसाठी जे कायदे आणले त्यामुळे शेतकरी आंदोलनाला बसले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी कायदे गौतम अदाणींसाठी आणत आहेत. असे आरोप राहुल गांधींनी केले होते.

# श्रीलंकेच्या माजी कर्णधाराचा जय शाहांवर गंभीर आरोप!



। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

श्रीलंकेचे माजी कर्णधार अर्जुन रणतुंगा यांनी बीसीसीआयचे सचिव जय शाह यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. जय शाह श्रीलंकेचं क्रिकेट उद्ध्वस्त करत आहेत, असा मोठा आरोप अर्जुन रणतुंगा यांनी केला आहे. २०२३ च्या क्रिकेट विश्वचषकातील श्रीलंकेच्या टीमच्या कामगिरीच्या पार्श्वभूमीवर रणतुंगा यांनी ही टीका केली आहे.

जय शाह श्रीलंकेचं क्रिकेट उद्ध्वस्त करत आहेत. जय शाह यांच्या दबावामुळे श्रीलंकेचं क्रिकेट उद्ध्वस्त होत आहे. भारतातील एका व्यक्तीमुळे श्रीलंकेच्या क्रिकेटचं हे नुकसान होत आहे. जय शाह हे केवळ त्यांचे वडील अमित शाह भारताचे गृहमंत्री आहेत म्हणून इतके शक्तिशाली आहेत," असंही अर्जुन रणतुंगा यांनी म्हटलं. मागील काही दिवसांमध्ये श्रीलंकेच्या क्रिकेटमध्ये मैदानावर आणि मैदानाबाहेर मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. एकदिवसीय विश्वचषकात श्रीलंकेच्या टीमचं वाईट प्रदर्शन झालं आहे. गुणतालिकेत श्रीलंकेचा संघ नवव्या क्रमांकावर खाली आला. त्यामुळे श्रीलंकेचा संघ २०२५ मधील चॅम्पियन ट्रॉफीसाठीही पात्र ठरला नाही. या कामगिरीनंतर श्रीलंकेचे क्रिडामंत्री रोशन रणसिंघे यांनी श्रीलंका क्रिकेट मंडळ बरखास्त केलं. तसेच श्रीलंकेचे माजी कर्णधार अर्जुन रणतुंगा यांच्या अध्यक्षतेखालील एक हंगामी समिती नेमली. मात्र, या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आलं. त्यानंतर न्यायालयाने क्रिडामंत्र्यांच्या या निर्णयाला १४ दिवसांची अंतरिम स्थगिती दिली. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच सरकारकडून क्रिकेट प्रशासनात जास्त हस्तक्षेप होतोय असं कारण देत आयसीसीने श्रीलंकेच्या क्रिकेट मंडळाला निलंबित केलं होतं.

# कंगनाने दणक्यात साजरी केली दिवाळी!

कंगना रणौत गेल्या काही दिवसांपासून तेजस या सिनेमामुळे चर्चेत होती. कंगनाला या चित्रपटाकडून खुप अपेक्षा होत्या मात्र तिचा हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाला.्यामुळे कंगनाची निराशा झाली. मात्र आता कंगनाने दिवाळीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला. ज्याची झलकही कंगनाने सोशल मीडियावर शेअर केली आहे. कंगनाने पांढरा आणि गुलाबी रंगाचा कॉम्बिनेशन लेहेंगा परिधान केला होता. ज्यात ती खूपच सुंदर दिसत आहे. त्या लेहेंग्यासोबत तिने प्लंगिंग नेकलाइन असलेला ब्लाउज आणि चोकर सेट, मॅचिंग कानातले, मांग टिक्का घातली होती. या लूकमध्ये ती पारंपारिक वेशात खुपच सुंदर





दिसत होती. या व्हिडिओत कंगना आनंदाने नाचताना आणि गाणं गाताना दिसत आहे. कंगनाने स्वतः इंस्टाग्रामवर असाच एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. कॅप्शनमध्ये ती लिहिते, "दिवाळी नेहमीच गोंधळलेली, व्यस्त, रोमांचक असणं आवश्यक आहे. सणातून मला हे सर्व मिळत... खरं तर माझा आवडता सण... दिव्यांचा सण, आम्ही साजरी केलेल्या दिवाळीची काही झलक." या व्हिडिओत कंगना तिची बहिणी, पुतण्या आणि कुटुंबातील सदस्यांसोबत आनंदाचे क्षण घालवताना दिसत आहे. सध्या कंगनाचा हा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे.

कंगना राणौतच्या वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले ती नुकतीच 'तेजस' चित्रपटात दिसली. मात्र हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाला तिच्या आगामी चित्रपटांबद्दल बोलायचं झालं तर ती लवकरच 'इमर्जन्सी' या चित्रपटात दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या भूमिकेत दिसणार आहे. यासोबतच ती 'सीता: द इनकार्नेशन' मध्ये देखील दिसली होती.

# माझ्या गाडीपासून लांब व्हा!



भारतीय क्रिकेट संघानं आपल्या विजयाची मालिका सुरुच ठेवली आहे. आता यापुढील भारताची लढत बलाढ्य न्युझीलंडशी होणार आहे. त्यामुळे वर्ल्ड कपमधील चुरस वाढली आहे. अशातच भारताचा विक्रमी फलंदाज विराट कोहली आणि त्याची पत्नी अभिनेत्री अनुष्का शर्मा यांच्या व्हायरल झालेल्या त्या व्हिडिओनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. नेदरलँडचा पराभव करुन भारतानं विजयाची पताका पुन्हा एकदा फडकावली आहे. भारत विरुद्ध नेदरलँडच्या सामन्याला विराटची पत्नी अनुष्का देखील उपस्थित होती. सध्या सोशल मीडियावर जो व्हिडिओ वेगानं व्हायरल झाला आहे ज्यामध्ये अनुष्कानं मीडियाच्या प्रतिनिधींना धारेवर धरले आहे. मीडियाचे काही व्यक्ती जेव्हा अनुष्काच्या कारजवळ गेले तेव्हा तिनं तीव्र शब्दांत राग व्यक्त केल्याचे दिसून आले. भारतानं नेदरलँडचा १६० धावांनी पराभव केला. यावेळी विराटची पत्नी अनुष्का स्टेडियममध्ये उपस्थित होती. विराटनं गोलंदाजी करत विकेट घेतल्यावर अनुष्कानं आनंद व्यक्त केला होता. त्यावर विराटला दादही दिली होती. विराट अन् अनुष्का हे जेव्हा मुंबईत आले तेव्हा त्यांना एअरपोर्टवर स्पॉट करण्यात आले.

# 'टायगर 3' दरम्यान फोडले फटाके; सलमाननं चाहत्यांना फटकारलं!

बॉलिवूड भाईजान सलमान खानचा 'टायगर 3' हा चित्रपट मोस्ट अवेटेड चित्रपट होता. 12 नोव्हेंबरला दिवाळीच्या मुहूर्तावर 'टायगर 3' चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला. सलमानचे चाहते या चित्रपटासाठी खुपच उत्सुक होते. चाहत्यांनी थिएटरमध्ये चित्रपट पाहण्यासाठी गर्दी केली होती. सध्या याचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. मात्र त्यात एक व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे ज्यात सलमानच्या चाहत्यांनी कहरच केला. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील हा व्हिडिओ आहे. जो X प्लॅटफॉर्मवर व्हायरल झाला होता. यात सलमानच्या चित्रपटाचा आनंद घेताना चाहत्यांनी थेट हॉलमध्ये फटाके फोडले. काही मिनिटातच चाहत्यांनी हॉलमध्ये फटाक्याची आतषबाजी झाली आणि सर्वत्र पळापळ सुरु झाली. चाहत्यांनी चित्रपटाचा आनंद साजरा करताना चित्रपटगृहातच रॉकेट उडवले आणि फटाके फोडले. आता हा व्हिडिओ



व्हायरल झाल्यानंतर थेट सलमान खानने या व्हिडिओवर प्रतिक्रिया देत चाहत्यांना चेतावणी दिली आहे.  सलमान खानने सिनेमा हॉलमध्ये फटाके फोडण्याच्या घटनेची दखल घेत सोशल मिडियावर लिहिले की, "मी टायगर 3 चित्रपट चालू असताना थिएटरमध्ये फटाक्यांची आतषबाजी करण्यात आल्याचं ऐकलं. हे धोकादायक आहे. स्वतःला आणि इतरांना धोका न देता चित्रपटाचा आनंद घेऊया. सुरक्षित रहा." तर दुसरीकडे या व्हायरल व्हिडिओवर प्रतिक्रिया देताना चित्रपट दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांनीही चाहत्यांवर टीका केली आहे. फटाक्यांचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी कारवाई करत या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. मोहन थिएटरवर छावणी पोलिस ठाण्यात कलम ११२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी दोघांना ताब्यातही घेण्यात आले आहे. दिग्दर्शक मनीष शर्माचा 'टायगर 3' हा एक ॲक्शन थ्रिलर आहे ज्यामध्ये सलमान खान, कतरिना कैफ आणि इमरान हाश्मी मुख्य भूमिकेत आहेत तर रेवती, सिमरन, रिद्धी डोगरा, विशाल जेठवा, कुमुद मिश्रा, रणवीर शौरे आणि आमिर बशीर हे देखील आहेत.

# शाबासकीनं आमची दिवाळी निघाली उजळून

स्टार प्रवाह वाहिनीवरील लोकप्रिय मालिका आई कुठे काय करते(AAI KUTHE KAY KARTE)ने कमी कालावधीत प्रेक्षकांच्या मनात आपलं स्थान निर्माण केलं. या मालिकेच्या कथानक आणि पात्रांना प्रेक्षकांची चांगलीच पसंती मिळत आहे. दरम्यान ठाण्यात दिवाळीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या दिवाळी पहाट कार्यक्रमात समीर चौघुले आणि आई कुठे काय करते फेम मधुराणी गोखलेने हजेरी लावली होती. या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (CM EKNATH SHINDE) यांनी आई कुठे काय करते मालिकेला दाद दिली. त्यानंतर फोटो शेअर करत मधुराणीनं सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. मधुराणी प्रभुलकर हिने दिवाळी पहाट कार्यक्रमातला फोटो शेअर करत लिहिले की, आजच्या 'रंगाई दिवाळी पहाट'ला खुद्द महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपस्थित होते .त्यांच्या समोर कविता ऐकवल्या , गझल गायली आणि त्यांची



उत्स्फूर्त दाद आणि शाबासकी ह्यांनी आमची दिवाळी अक्षरशः उजळून निघाली. ( कवितेचे आणि गाण्याचे व्हिडीओ लवकरच टाकते.) एकनाथ शिंदे हे मधुराणी प्रभुलकरला म्हणाले, "आई कुठे काय करते आपला कार्यक्रम अतिशय उत्तम सुरू आहे. श्रीकांतची आई (लता शिंदे) सुद्धा हा कार्यक्रम पाहताना मीदेखील कधी कधी पाहायचो. तुमची भूमिकाही उत्तम होती. तुमच्या विरोधातील भूमिका चांगली नव्हती. म्हणजे त्यांना जो रोल दिला तो त्यांनी केला. शेवटी पुरुषपण आमचे चांगले असतात."

आई कुठे काय करते मालिका उत्कंठावर्धक वळणावर आली आहे. यशने आरोहीकडे प्रेमाची कबुली दिली आहे आणि त्याच्या घरातल्यांनाही सांगितलं आहे. याला कांचन आजीचा विरोध आहे. त्यात आजी आरोहीला बोलून एक घटस्फोटीत व्यक्तीचं स्थळ आणते. मात्र त्यानंतर यश मला आरोहीशी लग्न करायचे असल्याचे सांगतो. त्याच्या या निर्णयाला अरुंधतीचा पाठिंबा आहे. मात्र या निर्णयाला अनिरुद्ध आणि कांचन आजीचा विरोध आहे. त्यामुळे यशला आरोही लग्नासाठी होकार देणार का आणि घरातलेही आरोहीला सून म्हणून स्वीकारतील का, हे पाहणे कमालीचं ठरणार आहे.

# क्रिकेटमध्ये विजयाची खात्री नसते!

## » न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात दडपण असेल

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारतीय संघाचा सामना न्यूझीलंडशी होणार आहे. दोन्ही संघांमधील ही लढत बुधवारी (15 नोव्हेंबर) मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. गेल्या काही आयसीसी स्पर्धांच्या बाद फेरीत टीम इंडियाची कामगिरी अत्यंत खराब झाली आहे. 2019 विश्वचषकाच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात संघाला न्यूझीलंडविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले होते. आता किवी संघाविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यापूर्वी भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड (RAHUL DRAVID) यांनी मोठे वक्तव्य केले आहे.**



भारतीय संघाने रविवारी (12 नोव्हेंबर) बंगळूरमध्ये झालेल्या नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात 160 धावांनी विजय मिळविला. या सामन्यानंतर संघाचे कोच राहुल द्रविड (RAHUL DRAVID) यांनी स्टार स्पोर्ट्स वाहिनीला मुलाखत दिली. यावेळी ते म्हणाले की, यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत भारत आणि न्यूझीलंडचे संघ दुस-यांदा भिडणार आहेत. पहिल्या सामन्यात भारताने विजय मिळवला. पण उभय संघांमध्ये दुसरी लढत ही उपांत्य फेरीत होत आहे. मात्र, या सामन्याबाबत आमचा दृष्टिकोन अजिबात बदलणार नाही. आपल्या सर्वांना माहित आहे की हा बाद फेरीचा सामना आहे आणि उपांत्य फेरीच्या सामन्यात थोडे दडपण असेल हे आपण स्वीकारले पाहिजे. तुम्ही फक्त तुमची सर्वोत्तम तयारी करू शकता आणि आम्ही ते करत आहोत.' आपल्या संभाषणादरम्यान, राहुल द्रविड (RAHUL DRAVID) यांनी नेदरलँड्सविरुद्ध चमकदार फलंदाजी करणाऱ्या श्रेयस अय्यरचे कौतुक केले. अय्यरच्या कामगिरीबाबत ते म्हणाले की, श्रेयस हा आमच्या मधल्या फळीचा कणा आहे. गेल्या 10 वर्षात चौथ्या क्रमांकावर चांगला खेळाडू शोधणे आमच्यासाठी खूप कठीण गेले आहे, हे सर्वांना माहीत आहे. श्रेयसने आपल्या खेळात सुधारणा करून आपली कुवत सिद्ध केली आहे. तो आता संघाचा एक महत्त्वाचा खेळाडू बनला आहे यात शंका नाही.' विश्वचषक २०२३चा पहिला सेमीफायनल सामना भारत आणि न्यूझीलंड यांच्यात होणार आहे. हा सामना बुधवार १५ नोव्हेंबर रोजी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. या वर्ल्ड कप स्पर्धेत भारतीय संघाने अद्याप एकही सामना गमावलेला नाही. सलग ९ सामने जिंकून टीम इंडियाने उपांत्य फेरीत धडक मारली आहे, त्यामुळे राहुल द्रविड आणि संघातील खेळाडू कोणतीही चूक करू इच्छित नाहीत. याच कारणामुळे राहुल द्रविड आणि इतर प्रशिक्षक मुंबईत पोहोचताच ते टीमबरोबर हॉटेलमध्ये नाही तर वानखेडे स्टेडियममध्ये खेळपट्टीची पाहणी करण्यासाठी गेले. बंगळुरूमध्ये नेदरलँड्सचा पराभव करून संघ जेव्हा मुंबईला रवाना झाला तेव्हा संघासाठी आजचा दिवस हा विश्रांतीचा होता. मात्र, मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड थेट कामाला लागले आणि ते सपोर्ट स्टाफसह खेळपट्टीच्या पाहणीसाठी वानखेडे स्टेडियमवर गेले. द्रविड, फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड आणि गोलंदाजी प्रशिक्षक पारस म्हांबरे १५ नोव्हेंबर रोजी भारत विरुद्ध न्यूझीलंड क्रिकेट विश्वचषक उपांत्य फेरीच्या सामन्यासाठी खेळपट्टीची पाहणी करण्यासाठी थेट स्टेडियमवर गेले. सध्याच्या स्पर्धेत द्रविड आणि इतर संघातील सदस्य हे नेहमीप्रमाणे खेळपट्टीची पाहणी करायला गेले. गेल्या आठवड्यात कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर देखील असेच दृश्य दिसले, जेव्हा द्रविड भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका सामन्यासाठी कोलकात्यात उतरल्यानंतर थेट खेळपट्टी पाहण्यासाठी ईडन गार्डन्सवर पोहोचला होता.

### क्रिकेट हा अनिश्चिततेचा खेळ

» आत्तापर्यंत भारतीय संघाने वेगवेगळ्या आयसीसी स्पर्धांमध्ये तीन वेळा न्यूझीलंडविरुद्ध बाद फेरीचे सामने खेळले आहेत आणि त्या सर्वांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्यातच न्यूझीलंडविरुद्ध 2019 च्या उपांत्य फेरीतील पराभवाची आठवण करून देत द्रविड यांनी भूतकाळातील अनुभवांमधून शिकण्यावर भर दिला. क्रिकेट हा अनिश्चिततेचा खेळ आहे. जेव्हा सगळे चांगले चाललेले असते तेव्हा सर्वांचे कौतुक होते. चाहते खेळाडूंना डोक्यावर घेतात. पण एका पराभवाने सगळेच गणित बिघडते. खेळाडूंवर सडून टीकेला सामोरे जावे लागते. उटसुट सगळेजण तुम्हाला काही कळत नाही, असे टोमणे मारले जातात.

# गौतम गंभीरकडून रोहित शर्माचे कौतुक!

## » तो भारताच्या इतर कर्णधारांपेक्षा खूप वेगळा

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताचा माजी क्रिकेटपटू गौतम गंभीरने रोहित शर्माच्या कर्णधारपदाच्या नेतृत्व गुणाचे कौतुक केले आहे. “तो खेळाडूंना किती जपतो आणि कुठलाही दबाव टाकत नाही रोहित यावरून चांगला कर्णधार ओळखला जातो,” असे गंभीर म्हणाला. केवळ या विश्वचषकातच नाही तर रोहितच्या बाजूने हे नेहमीच दिसून आले आहे. विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघ आपले सर्व ९ साखळी सामने जिंकून पहिल्या क्रमांकावर आहे.**



### रोहित शर्माची आक्रमक वृत्ती

» सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याने त्या ड्रेसिंग रूममध्ये अतिशय खेळीमेळीचे वातावरण निर्माण केले आहे. यामुळेच तो भारताच्या इतर कर्णधारांपेक्षा खूप वेगळा आहे. पॉवरप्लेमध्ये रोहितची आक्रमक वृत्ती ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार ॲरॉन फिंचला आवडते. “रोहितने संघाला वेगवान सुरुवात देण्याचा प्रयत्न केला आहे. स्पर्धा जसजशी पुढे सरकत गेली तसतशी विकेट संथ होत गेली हे तुम्ही पाहिले असेल.

रोहितने मुंबई इंडियन्सच्या नेतृत्वाखाली पाच वेळा आयपीएलचे जेतेपद पटकावले आहे. त्याच्या नेतृत्वाखाली, एमआय पलटणने २०१३ मध्ये आता बंद झालेली चॅम्पियन्स लीग टी२० स्पर्धा देखील जिंकली आहे. सध्या सुरू असलेल्या विश्वचषकात, रोहितने फलंदाजी आणि नेतृत्व कौशल्याने चमकदार कामगिरी केली आहे कारण, भारत साखळी टप्प्यात अपराजित राहिला आहे. उपांत्य फेरीत पोहोचण्याआधी टीम इंडियाने सलग नऊ सामने जिंकले. भारताचा आता बाद फेरीचा सामना हा बुधवारी न्यूझीलंडशी होईल. “एक चांगला कर्णधार आणि नेता तुम्हाला सुरक्षा देतो, ज्यामुळे ड्रेसिंग रूम केवळ त्याच्यासाठीच नाही तर इतर १४ खेळाडूंसाठीही सुरक्षित होते आणि दबाव कमी करते. रोहित शर्माने नेमके हेच केले आहे.” तो पुढे म्हणाला, “म्हणूनच त्याने पाच आयपीएल ट्रॉफी जिंकल्या आहेत. जेव्हा त्याने हे सर्व आंतरराष्ट्रीय सामने खेळायला सुरुवात केली तेव्हा त्याचे विजयाचे प्रमाण विलक्षण होते. तुम्ही आकडेवारी आणि ट्रॉफी पाहिल्यास, तो सर्व बॉक्सवर टिक करत आहे

# गोलंदाजी प्रशिक्षकाने सोडली पाकिस्तानची साथ

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

विश्वचषकातून बाहेर पडल्यानंतर पाकिस्तान संघात राजीनाम्याची चढाओढ सुरू झाली आहे. पाकिस्तानचे गोलंदाजी प्रशिक्षक मोर्ने मॉर्केल याने सोमवारी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे, असे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. प्रशिक्षक मोर्ने मॉर्केल सहा महिन्यांच्या करारावर जूनमध्ये संघात सामील झाला होता. पीसीबीने मॉर्केलच्या बदली दुसरे नाव दिलेले नाही आणि योग्य वेळी याबाबत निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. यानंतर पाकिस्तानला डिसेंबरमध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जायचे आहे, ज्यामध्ये ते तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहेत. विश्वचषकात पाकिस्तानने आपल्या मोहिमेत विजय मिळवून चांगली सुरुवात केली होती. भारताविरुद्धच्या पराभवानंतर त्यांची खराब कामगिरी सुरु झाली. त्यांनी त्यानंतर सलग चार सामने गमावले. इंग्लंडविरुद्धच्या त्यांच्या अंतिम साखळी टप्प्यातील सामन्यात उपांत्य फेरीत स्थान मिळवण्याची त्यांची शक्यता जवळपास संपल्यात जमा होती. संघाला ६.४ षटकांत ३३८ धावांचे मोठे लक्ष्य गाठावे लागणार होते, जे की अशक्य होते. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तान उपांत्य फेरीसाठी पात्र ठरण्यात अपयशी ठरण्याची ही सलग पाचवी वेळ होती. या मोहिमेने पाकिस्तानची जागतिक दर्जाची गोलंदाजी आणि फलंदाजीतील कच्चे दुवे उघड झाले आहेत. माजी विश्वचषक विजेता आणि महान वेगवान गोलंदाज वसीम अक्रम याने संघाच्या खराब कामगिरीचे खापर वेगवान गोलंदाजांवर फोडले आहे.